# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०४/२०२४ (शुक्रवार) दुपार**

---

## नागपूर ग्रामीण पोलीसांची मतदार जनजागृतीपर मोहीम

आगामी लोकसभा निवडणुक २०२४ संबंधाने नागपूर ग्रामीण पोलीस दलातर्फे मतदारांना **निर्भय आणि मुक्त मतदान व्हावे** याकरीता मतदार जनजागृतीची मोहीम राबविण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीच्या अनुशंगाने मतदारांना धाक दपटशाही तसेच पैशाचे आमिश देवुन मतदान करण्यासाठी दबाव आणण्याची शक्यता नाकारता येणार नाही. म्हणुन नागपूर ग्रामीण पोलीसांतर्फे मतदारांना ‘‘**कृपया मतदान करा मुक्त आणि निर्भय नागपूर ग्रामीण पोलीस तुमच्या पाठीशी आहेत.** ’’ अशा आशयाचे बॅनर विविध दर्शनी ठिकाणी तसेच पोलीस स्टेशन समोर बस स्टॅंड, गर्दीचे ठिकाणी, बाजारतळ अशा विविध ठिकाणी सदरचे जनजागृतीचे फ्लेक्स लावण्यात आले आहेत. जर मतदारांना कुठल्याही धाक दपटशाही किवा वेगळे प्रलोभन कोणी देत असेल तर टोल फ्री क्र. ११२ वर कॉल करावा संबंधित व्यक्तीविरूद्ध योग्य ती कारवाई करण्यात येईल.

सदरची मोहीम मा. नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व ठाणेदार हे राबवित आहेत.














पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर